Vol. 5 | No. 5 | October 2019

Impact Factor: 4.197 | ISSN: 2454-5503

# CHRONICLE OF HUMANITIES AND CULTURAL STUDIES

A Peer Reviewed Bimonthly International Journal

Special Issue On

## IMPACT OF SOCIAL MEDIA ON SOCIETY




Guest Editor
Dr. Vasant Satpute

Associate Editor
Dr. M. D. Kachave

Assistant Editors
Dr. B. V. Andhale
Dr. M. G. Somvanshi
Dr. A. B. Sarkale

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

## अनुक्रमणिका

१. शिवसेनेचे राजकारण आणि सोशल मिडिया
**प्रा.संजय मोहाडे / डॉ.सुनिल शिंदे** | 07

२. आसाराम लोमटे यांचे वर्तमानपत्रातील लेखांचे सामाजिक स्वरुप : एक अभ्यास / **संजय नामदेवराव आठवले** | 11

३. समाजासमोरीलसोशल मिडीयाची नवी आव्हाणे / **डॉ.अतुल कदम** | 18

४. सोशल मिडियाच्या दुष्परिणामावर भाष्य करणारे नाटक : मना सज्जना / **डॉ. संदिप बनसोडे / सुनिल सदाशिवराव कांबळे** | 23

५. महिला आणि सोशल मिडिया / **डॉ. अंबादास पांडुरंग बर्वे** | 27

६. पर्यावरण आणिसोशल मिडिया / **डॉ.बोचरे जे.एम.** | 33

७. समाजमाध्यमांच्या जगातातील पत्रकारिता: सद्यस्थिती, ट्रेंड्स आणि आव्हाने /
**शरद बोदगे** | 36

८. सोशल मिडीया आणि राजकारण /
**प्रा. स्वाती बोकारे / डॉ. स्वाती पाटील** | 39

९. समाज माध्यमं आणि भारतीय शास्त्रीय संगीत / **सौ.संगीता र. चाटी** | 43

१०. सोशल मिडिया आणि शेतीमालाचे विपणन / डॉ.बी.आर. शिंदे | 48

११. प्रसारमाध्यमे आणि बदलते जीवनप्रवाह / **डॉ. चंद्रकांत गजेवाड** | 52

१२. सोशल मिडिया आणि बँक व्यवहार / **डॉ. देशमुख एम.व्ही.** | 55

१३. व्यक्तिसंबंधावर सोशल मिडियाचा प्रभाव / डॉ. बालाजी डिगोळे | 58

१४. युवक आणि समाजमाध्यम / **डॉ. मोराती बा. भोसले** | 63

१५. आधुनिक राजकारणात सोशल मिडीयाची भुमिका / **डॉ.साहेब राठोड** | 67

१६. सामाजिक प्रसार माध्यमांमुळे निर्माण होणारी सायबर गुन्हेगारी /
**गोपाळ गांगर्डे** | 71

१७. सामाजिक प्रसार माध्यमांमुळे निर्माण होणारी सायबर गुन्हेगारी /
**डॉ. सुनिता आ. टेंगसे / गोपाळ म. गांगर्डे** | 77

१८. नवतंत्रज्ञानाचा सोशलमिडियावर पडलेला प्रभाव / **आदित्य गुंड** | 83

१९. कृषी विस्तार आणि संवादामध्ये समाजमाध्यमांचा (सोशल मिडीया) वापर /
**जयंत दा. गायकवाड** | 89

२०. सोशल मीडिया आणि आजची वस्तूस्थिती / **डॉ. एम. डी. कच्छवे** | 9?

२१. नवतंत्रज्ञानाच्या साह्याने मराठीचे अध्यापन / **सखाराम बा. कदम** | 102

२२. माध्यमांच्या सामाजिक जबाबदारचे अवलोकन / **डॉ. हरिभाऊ कदम** | 106

२३. ग्रंथालय व सोशल मिडिया / **संगिता कातळे** | 110

२४. सोशल मिडीया आणि शैक्षणिक व्यवस्था / **डॉ.कहाळेकर जी.वाय.** | 115

२५. सोशल मिडियाचा समाजावरील प्रभाव / **मनीषा तु. खंडाळे** | 118

२६. सोशल मीडिया आणि सायबर गुन्हेगारी / **डॉ.सचिन खोकले** | 123

२७. ग्रंथालयात सोशल मीडीयाचा वापर– एक दृष्टिक्षेप /
**कु. शारदा के. लांजेकर** | 126

२८. साहित्य आणि सोशल मिडिया / **डॉ. राम मायकर** | 132

२९. सोशल मिडीया- आनंददायी भस्मासुर / **डॉ. मोहन मिसाळ** | 135

३०. प्रसार माध्यमाचे बदलते स्वरूप / **डॉ.अंभुरे एस.डी** | 138

३१. समाजमाध्यमांचा सुनियोजि तवापर महिलांसाठी वरदान /
**डॉ. जयदेवी पवार** | 141

३२. माध्यमांची सामाजिक बांधीलकी : एक चिंतन / **डॉ.श.द. परळकर** | 145

३३. पत्रकारिता आणि सोशलमिडीया / **समाधान दराडे** | 149

३४. सोशल मिडीयाची बँकींग क्षेत्रातील भूमिका / डॉ.सावके भागवत शा. | 155

३५. समाजासमोरील सोशल मिडीयाचे नवीन आव्हाने / **डॉ.शिंदे सुरेखा स.** | 158

३६. प्रसारमाध्यमातून मराठी साहित्यदर्शन : एक शोध /
**डॉ. नामदेव सोडगीर** | 161

३७. सामाजिक माध्यमांचा प्रशासनावरील प्रभाव /
**डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)** | 166

३८. कृषि क्षेत्रावरील समाजमाध्यमांचा प्रभाव /
**स्वप्नील उबाळे / प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता** | 173

३९. सोशल मिडीयाची क्रिडा क्षेत्रातील भुमिका व योगदान /
गोविंद वाकनकर | 179

४०. समाजावर सोशल मीडियाचा प्रभाव / **यादव कल्याण द.** | 182

४१. महिला आणि सोशलमीडिया / **आरती श्या. खांबेकर** | 186

४२. राजकारण आणि सोशलमिडिया / **अशोक कि. वाकडे.** | 192

# 37.

## सामाजिक माध्यमांचा प्रशासनावरील प्रभाव

**प्रा.डॉ.सोमवंशी मुक्ता (गंगणे)**
सहयोगी प्राध्यापक तथा
लोकप्रशासन विभाग प्रमुख,कै.रमेश वरपुडकर महाविद्यालय सोनपेठ जि.परभणी

जगाच्या पाठीवर सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून भारताची ओळख आहे. अर्थातच या देशाची लोकसंख्या जगात दुसऱ्या क्रमांकाची असुन आज जवळपास एकसे तीस कोटी लोक भारतात आहे. यातील बहुसंख्य लोकांना इंटरनेट वापराचे कसब अवगत आहे. आणि अलीकडच्या काळात मोबाईलमध्ये जी काही क्रांती होत आहे. त्याचा लाभ घेण्याऱ्यामध्येही भारतीय लोक आघाडीवर असल्याचे दिसून येते. भारतात इंटरनेटचा वार करणाऱ्या लोकांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन ती दिवसेनदिवस वाढतच आहे. याच बरोबर सोशल मिडीया अथवा सामाजिक माध्यमांच्या वापरामध्येही भारतीय लोक मोठ्या संख्येने आढळून येतात. व्हॉट्सप, ट्विटर, फेसबुक, यूट्यूब .... इ. सामाजिक माध्यमांचा वापर प्रत्येक क्षेत्रात कार्य करणाऱ्या व्यक्तीकडुन केला जात आहे. त्यामुळे आज सोशल मिडीया हा सर्वसामान्य माणसाच्या जीवनाचा एक अविभाज्य भाग झाला आहे. असे म्हटले तर खोटे ठरनार नाही. जेंव्हा एखाद्या ठिकाणी अनेक लोक एकत्रीत येतात तेंव्हा तेथे काही समस्या व प्रश्न निर्माण होतात. अशा समस्या व प्रश्न सोडविण्यासाठी प्रशासनाची आवश्यकता असते. थोडक्यात जेथे-जेथे मानवी समाज तेथे-तेथे प्रशासकीय यंत्रणा आवश्यक ठरते.म्हणुन सामाजिक माध्यमे सुध्दा लोकप्रशासनाच्या कार्यक्षेत्राबाहेर राहू शकत नाहीत. अथवा लोकप्रशासनही सामाजिक माध्यमांपासून स्वतःला दूर ठेवून शकत नाही. कारण समाजातील प्रत्येक घटकाचा प्रभाव लोकप्रशासनावर पडत असतो. आजच्या सामाजिक माध्यमांचाही प्रशासन यंत्रणेवर कमी अधिक प्रमाणात प्रभाव पडलेला आहे. या प्रभावाचा चिकित्सक अभ्यास करण्यासाठी प्रस्तुत शोधनिबंधात प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दती :-** शोधनिबंध लिहिण्यासाठी वर्णनात्मक व सांख्यिकी पध्दतीचा अवलंब करण्यात आला आहे.

**तथ्य संकलन :-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक व दुय्यम साधन सामग्रीचा वापर करण्यात आला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी मुलाखत अनुसूची, निरिक्षण व अनुभवाचा आधार घेण्यात आला आहे. दुय्यम साधन सामग्रीमध्ये संदर्भ ग्रंथ, वृत्तपत्र व इंटरनेट यांचा आधार घेण्यात आला आहे.



Sonpeth Pin-431516 ACS College Ta.Sonpeth Dist.Parbhani

**शोध निबंधाचे उद्देश :-**

१) समाज माध्यमांचा अर्थ स्पष्ट करणे.

२) समाज माध्यमांचा प्रशासनावरील प्रभाव स्पष्ट करणे.

**गृहितकृत्य :-**

१) समाज माध्यमांमुळे प्रशासन यंत्रणा प्रभावीत होते.

२) समाज माध्यमांमुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यात वाढ झाली.

**समाज माध्यमांचा अर्थ :-** माणूस एक सामाजिक प्राणी असल्यामुळे त्याला इतर माणसांशी जोडायला आवडते आणि ज्या ॲप्सद्वारे माणसे ऐकमेकांशी जोडली जातात त्यांना समाज माध्यम म्हटले जाते. जसे व्हॉट्सॲप, युट्यूब, फेसबुक असे अनेक ॲप्स उपलब्ध आहेत. यातील बहुतेक ॲप्स विनामुल्य वापरता येतात. तसेच अलिकडच्या काळात इंटरनेटच्या वापराचे दर देखील स्वस्त झाले आहेत. त्यामुळे सामान्य माणसांच्या बजेटमध्येही हे शक्य होत आहे. त्यामुळे बहुतांश कुटूंबात घरातील प्रत्येक सदस्याकडे मोबाईल असून प्रत्येकजन या सोशल मिडीयाचा वापर कमी अधिक प्रमाणात करतांना दिसून येतो. जगात सर्वत्र सामाजिक माध्यमांचा वापर केला जात आहे. भारतात कोट्यावधी लोक सामाजिक माध्यमांचा वापर करीत आहेत. सामाजिक माध्यमे ही दुधारी शस्त्र असुन त्याचा आपण कसा वापर करतो यावर त्याचे परिणाम अवलंबुन आहेत. ॲड्रिस कॅप्लन आणि मायकेल हैनलैन, ``इंटरनेटच्या आधाराने, आंतरक्रियांना चालना देणाऱ्या प्रकारामधील संदेशवहन वापरून, वापरकर्त्यांनाच आशयनिर्मिती आणि त्याच्या देवाण-घेवणीची सुविधा देणाऱ्या व्यासपिठांच्या गटांना सोशल मिडिया म्हटले जाते.``[१]

`जागतिक पातळीवर इंटरनेट आणि सोशल मिडियाच्या वापराचे सर्वेक्षण आणि विश्लेषणात्मक अभ्यास करणाऱ्या `हुटसूट` या कंपनीने जानेवारी २०१८ मध्ये प्रसिध्द केलेल्या `वुई आर सोशल` या अहवालानुसार भारतात देशाच्या एकूण लोकसंख्येपैकी ३४ टक्के लोकसंख्या ही इंटरनेटचा वापर करू शकणाऱ्यांमध्ये मोडते. मोबाईल फोनचा वापर करून इंटरनेट वापरणाऱ्यांचे प्रमाण एकूण इंटरनेट वापरकर्त्यांच्या ७९ टक्के इतके आहे. इंटरनेटच्या या वापरापाठोपाठ सोशल मिडिया वापराच्या भारतीयांच्या सवयीबाबतही हा अहवाल प्रकाश टाकत आहे. त्यानुसार भारतात सोशल मिडिया वापरणाऱ्यांची संख्या मागील वर्षीच्या तुलनेत ३१ टक्क्यांनी वाढली आहे. फेसबुक वापरकर्त्यांमध्ये पुरूष वापरकर्त्यांची संख्या अधिक असलेल्या देशांमध्ये भारताचा क्रमांक सातवा आहे. भारतात इन्टाग्राम वापरकर्त्यांची संख्या पाच कोटी वीस लाखांच्या घरात असल्याचेही या अहवालातून सांगण्या आले आहे.`[२] सोशल मिडियाचा वापर करणाऱ्या लोकांची संख्या दिवसेनदिवस वाढत आहे.

Sonpeth Pin-431516 Ta. Sonpeth Dist. Parbhani

सोशल मिडियाची वेगवान वाढ होणाऱ्या देशांमध्ये भारताचा जगात दुसरा क्रमांक आहे. भारतात इंटरनेट वापरणाऱ्यापैकी ३२ टक्के लोक कामाचा भाग म्हणुन सोशल मिडिया वापरतात, हे ही, `हूटसूट` च्या आकडेववरीत समोर आले आहेत. `हुटसूट`च्या `फेसबुक रीच रॅंकिंग` मध्ये भारत जगात पहिल्या क्रमांकावर आहे. या विषयीच्या आकडेवारनुसार, भारतात ३० कोटी लोकांपर्यंत फेसबुक पोहचले आहे`[३] व्हॉट्सअॅप, फेसबुक, मेसेंजर आणि इन्टाग्राम ही चार अॅप जगभरात मोबाईल फोनवरून सर्वाधिक वापर होणाऱ्या पहिल्या पाच अॅपमध्ये समाविष्ट होत आहेत.

सोशल मिडिया हे जागतिकरणानंतरच्या गतिमान युगाच प्रतिबिंब आहे. माणसं व्यक्तिस्वातंत्र्याच्या प्रेमात गुरफटत असताना सामाजिकतेचा सामूहिक आधुनिक अर्थ लावायला भग पाडणं, हे या माध्यमांच फलित आहे. समाजाच्या रोज बदलणाऱ्या अपेक्षांचा दबाव निर्माण करणाऱ्या भूमिकांचं त्यात प्रतिबिंब आहे. ही सर्व व्यवस्था अभासी आहे. परंतु आजच्या काळात हे माध्यम चौथ्या स्तंभाची आधुनिक पध्दतीची बुज सांभाळण्याचा प्रयत्न करत आहे.`[४]

अलीकडच्या काळात एक गोष्ट व्हॉट्सअॅप वर दिसून येत होती की, `व्हॉट्सअपवरून देण्यात येणाऱ्या सूचना ग्राह्य धराव्यात` वरिष्ठ अधिकाऱ्याने कनिष्ठाला एखादी आज्ञा व्हॉट्सअॅपवरून दिली असेल तर ती पालन करणे आवश्यक आहे, ही चर्चा झाली . आज बहुतांश कार्यालयामध्ये व्हॉट्सअॅपचा वापर कार्यालयीन माहिती देण्यासाठी केला जात आहे. कारण व्हॉट्सअॅप हे माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी अतिशय सहज आणि सोपे माध्यम आहे. तसेच प्रशासनाविषयी , प्रशासकीय योजनांची माहिती सोशल मिडियावरून प्रसारित केली जात आहे. ट्विटर सारख्या माध्यमाचा वापर करून त्यावर अनेकांची मते व प्रतिक्रया एकाचवेळी अनेक लोकांना कळतात. परवाच डॉ.मनमोहनसिंग यांनी अर्थव्यवस्थेला उद्देशून आपले मत व्यक्त केले असता फेसबुकवरून हजारो लोकांनी त्यावर आपल्या प्रतिक्रया दिल्या. यावरून सोनपेठ तालुक्यातील प्रशासकीय यंत्रणेवर या सोशल मिडियाचा काही प्रभाव आहे किंवा नाही याचा अभ्यास करण्यासाठी हा शोधनिबंध लिहिण्याचा प्रयत्न केला आहे.

**माहिती विश्लेषण :-** प्रस्तुत शोधनिबंधासठी सोनपेठ तालुक्यातील वेगवेळ्या क्षेत्रातील ४० कर्मचाऱ्याकडुन मुलाखत अनुसूची भरून घेण्यात आली. त्यानुसार प्राप्त झालेल्या माहितीचे विश्लेषण असे. व्हॉट्सअॅप, इंस्टाग्राम, युटूब, फेसबुक, टेलिग्राम, मॅसेंजर, या सामाजिक माध्यमाचा वापर करणारे कर्मचारी आढळून आले. तसेच कोणते साधन अधिक प्रभावी वाटते ? या प्रश्नाच्या उत्तरामध्ये सर्वाधिक पसंती व्हॉट्सअॅप याला ६५ टक्के कर्मचाऱ्यांनी देवून हे साधन वापरण्यास सोपे असल्याचे मत व्यक्त केले तर ३५% कर्मचाऱ्यांचे मते फेसबुक अधिक प्रभावी माध्यम असल्याचे निदर्शनास येते. समाज माध्यमे माहितीच्या प्रसारासाठी उपयुक्त



Sonpeth Pin-431516

आहेत का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ९७.५% कर्मचाऱ्यांनी होय असे मत व्यक्त केले. तर केवळ २.५ टक्के कर्मचाऱ्यांनी नाही असे मत व्यक्त केल्याचे निदर्शनास येते. समाज माध्यमांच्या माध्यमातून विधायक कार्य होऊ शकतात असे आपणास वाटते का ?असा प्रश्न विचारण्यात आला असता ९२.५% कर्मचारी सहमत असल्याचे आढळुन येते. तर केवळ ७.५% कर्मचारी यास असहमती दर्शवितात. समाज माध्यमांच्या माध्यमातून ज्ञानाचा प्रसार होतो का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता होतो असे मत देणारे कर्मचारी ९२.५% असल्याचे आढळुन येतात तर केवळ ७.५% कर्मचाऱ्यांना ज्ञानाच्या प्रसारासाठी समान माध्यमांचा उपयोग होतो असे वाटत नाही. समाज माध्यमांतून आपण काही माहिती प्रसारित करता का ? यावर ८७.५% कर्मचाऱ्यांनी होय असे कम व्यक्त केले.

समाज माध्यमांचा वापर प्रशासकीय कार्यासाठी केला जातो का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ९२.५% कर्मचाऱ्यांच्या मते प्रशासकीय कार्यासाठी समाज माध्यमांचा वापर केला जातो तर केवळ ७.५% कर्मचारी नाही असे मत व्यक्त करतांना आढळून येतात. आपण स्वतः कार्यालयीन कामासाठी समाज माध्यमांचा वापर करता का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ९०% कर्मचाऱ्यांनी होय म्हटले तर केवळ १०% कर्मचारी वापर करीत नसल्याचे निदर्शनास येतात. आपल्या सूचनांना योग्य प्रतिसाद मिळतो का ? असा प्रश्न विचारला असता ८०%कर्मचारी होय असे म्हणतात परंतु सर्व कर्मचाऱ्यामध्ये प्रतिसाद देण्याची मानसिकता असतेच असे नाही असे मत व्यक्त केले.

आपल्या कार्यक्षेत्रात समाज माध्यमे कार्यक्षमता वाढविण्यासाठी पोषक ठरले आहेत का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ८७.५% कर्मचा-यांना समाज माध्यमे कार्यक्षमता वाढविण्यासाठी पोषक ठरले आहेत असे वाटते तर १२.५% व्यक्तींना त्याचा प्रभाव जाणवत नसल्याचे निदर्शनास येते. आपल्या कार्यक्षेत्रात समाज माध्यमामुळे काही समस्या निर्माण झाल्या का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ३५% व्यक्तींना समाज माध्यमामुळे त्यांच्या कार्यक्षेत्रात समस्यांना सामोरे जावे लागल्याचे दिसून येते. समाज माध्यमामुळे पोलिस प्रशासनाच्या कार्यात वाढ झाली आहे का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ८५.५% व्यक्तींना झ ााली आहे असे वाटते. आपत्कालीन परिस्थितीत समाज माध्यमांची मदत होते का ? असा महत्वाचा प्रश्न विचारण्यात आला असता ८७.५% व्यक्तींनी होय असे मत व्यक्त करून समाज माध्यम आपत्कालीन परिस्थितीत महत्वाची ठरतात असे म्हटले.

समाज माध्यमे जशी उपयुक्त आहेत तशीच या समाज माध्यमामुळे अनेक व्यक्तींना त्रास झाल्याचे समाजात आढळुन येते. तेव्हा प्रशासनातील व्यक्तींना समाज

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

माध्यमांच्या गैरवापरामुळे त्रास झाला आहे का ? हे जाणुन घेण्याचा प्रयत्न केला असता ३७.५% व्यक्तींनी त्यांना त्रास झाल्याचे मत व्यक्त केले.

समाज माध्यमांचा प्रशासनावर प्रभाव पडला आहे का ? हे जाणुन घेण्यासाठी समाज माध्यमामुळे आपल्या जबाबदारीत वाढ झाली आहे असे आपणास वाटते का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता यावर ८०% लोकांनी आपल्या जबाबदारीत वाढ झाली असल्याचे मत मांडले.

समाज माध्यमामुळे भ्रष्टाचारावर कांही परिणाम झाला का ? हे पाहण्यासठी समाज माध्यमामुळे भ्रष्टाचारास आळा बसला का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता यावर ६०% लोकांनी त्याचा काही प्रमाणात उपयोग होतो असे मत मांडले आहे. समाज माध्यमामुळे समाजात काही समस्या निर्माण झाल्याचे वृत्तपत्रातुन वाचण्यात आले तेंव्हा समाज माध्यमामुळे काही समस्या निर्माण होतात का ? हे जाणुन घेण्यासाठी समाज माध्यमामुळे समाजात काही समस्या निर्माण होतात का ? असा प्रश्न विचारण्यात आला असता ६५% कर्मचाऱ्यांनी समाज माध्यमामुळे समाज समस्या निर्माण होतात असे मत व्यक्त केले या प्रश्नास पुरक प्रश्न कोणत्या समस्या निर्माण होतात असा प्रश्न विचारला असता अफवा पसरवणे, लोकांना चुकीची व असंदर्भीय माहिती पुरवणे, मुला-मुलींचे प्रोफाईल फोटो चोरून त्याचा गैरवापर करणे एकमेकास त्रास देणे, फसव्या जाहिराती मेसेजेस मधून आर्थिक लूट होते, फोग्राम मिक्स करून शेअर केल्यामुळे अनेकांची बदणामी होते. सामाजिक शांतता भंग होते. समाज माध्यमामुळे व्यक्ती मोबाईलच्या संपर्कात अधिक राहतो यातुन त्याचे आरोग्य धोक्यात येत आहे. धार्मिक व जातीय तेढ निर्माण होते. अपप्रचारास वाव मिळतो. आर्थिक नुकसान होते. वेळ वाया जातो. असामाजिक व वाईट घटना वारंवार प्रसारीत केल्यामुळे गैरसमज निर्माण होतात सायबर गुन्हे वाढले, युवकांचे अभ्यासापेक्षा समाज माध्यमाकडे अधिक लक्ष दिल्यामुळे त्यांचे नुकसान होत आहे. माणसामधील जवळीकता कमी होत चालली आहे. टिकटॉकसारख्या माध्यमामुळे गेममुळे अनेक लोकांना आपला जीव गमवावा लागला आहे. कायदा आणि सुव्यवस्था धोक्यात येत आहे. अशा विविध समस्या सोशल मिडियाच्या माध्यमातून निर्माण होतात असे सर्वेक्षणातुन आढळुन आले आहे.

समाज माध्यमाविषयी मुलाखत दात्यात्यांची मते आजमावत असतांना असे दिसुन आले की, आजच्या धकाधकीच्या काळात समाज माध्यमे गरजेची आहेत. त्यांचा विधायक, कृतीशील व विचारपुर्वक वापर झाल्यास समाज माध्यमाने निश्चितपणे उपयोगी ठरू शकतात. समाज माध्यमे ही जनजागृतीची काम करतात. नवनवीन गोष्टी घरबसल्या समजतात. समाज माध्यमामुळे लोकांना शासकीय योजनांची माहिती मिळणे सोपे झाले आहे. समाज माध्यमे ही दुधारी तलवार आहे.



Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

त्याचा सदसदाविवेक बुध्दीने वापर केला तर ते वरदान व अयोग्य वापर केला तर ते शाप ठरू शकते.

समाज माध्यमांच्या प्रभावी वापराविषयी मुलाखतदात्यांची मते जाणून घेण्यासाठी त्यांना सूचना करण्याचे आव्हान केले असता अनेक महत्वपुर्ण सूचना मिळाल्या त्यापैकी काही महत्वाच्या सूचना वापरकर्त्यांनी माहितीचा स्त्रोत व विश्वासहर्तता पडताळुन ती प्रसारीत करावी. वापरकर्त्यांकडे नैतिकता व सामाजिक भाव असणे आवश्यक आहे. समाज माध्यमांच्या वापरासाठी जागृत व प्रशिक्षित समाज बनविणे आवश्यक आहे. समाज माध्यमांचा विचारपुर्वक वापर करावा. धार्मिक, सामाजिक, राजकीय विधाने करतांना त्याच्या साधकबाधक परिणामांची विचार करूनच समाज माध्यमांचा वापर करावा अशा महत्वपुर्ण सूचना मुलाखतदात्यांनी केल्या आहेत.

समाज माध्यमांचा वापर प्रशासनामधील कर्मचारी वर्गाकडुन प्रशासकीय कामकाजासाठी केला जात आहे. माहितीची देवाण-घेवाण करण्यासाठी व्हॉट्सॲप सारखे माध्यम प्रभावी ठरत आहे. २०११ मध्ये अण्णा हजारेंच्या आंदोलनाला समाज माध्यमातुन मोठ्या प्रमाणात पाठींबा मिळाला होता. तसेच २०१३ साली निर्भया प्रकरणात लोकांनी रस्त्यावर उतरून या घटनेचा निषेध केला. यामुळे प्रशासनाला या गोष्टींची गांभीर्याने दखल घेणे भाग पडले.

आज सोशल मिडियाच्या माध्यमातून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध झाल्या आहेत. त्याचा तरूणांना फायदा होऊ शकतो. यापुर्वीही अनेक तरूणांना सोशल मिडियाच्या माध्यमातून रोजगार मिळाल्याचे अनेक उदाहरणे आहेत. त्याच सोबत अवयवदान, रक्तदान, यासारख्या चळवळी मध्ये समाजामध्ये महत्वाची भुमिका बजावू शकतात. सोबतच अनेक समाज उपयोगी कार्यांना चालना देण्यासाठी सोशल मिडियाचा प्रभावी उपयोग केल्या जाऊ शकतो. सोशल मिडिया हे आपल्या हातात असलेल्या दुधारी शस्त्राप्रमाणे आहे. त्याचा उपयोग समाज हितासाठी कसा करावया हे ज्याच त्यांने ठरवले पाहिजे.

**गृहितकृत्य पडताळणी :-** उपरोक्त विश्लेषणावरून शोधनिबंध लिखाणासाठी निश्चित करण्यात आलेले गृहितकृत्य क्रमांक १ माध्यमांमुळे प्रशासन यंत्रणा प्रभावित होत हे सत्य असल्याचे सिध्द होते. त्याचबरोबर गृहितकृत्य क्रमांक २ समाज माध्यमामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यात वाढ झाली हे गृहितकृत्यही सत्य असल्याचे सिध्द होते. समाज माध्यमांमुळे प्रशासनावर अनुकूल व प्रतिकुल प्रभाव पडतो.

**निष्कर्ष व समारोप :-** प्रस्तुत शोधनिबंधातून असे निदर्शनास येते की प्रशासनात समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. तसेच प्रशासकीय कार्यामध्ये कार्यक्षमता वाढीस लावण्यास समाज माध्यमे महत्वाची ठरू शकतात.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

परंतु त्यास प्रकारेच्या व्यक्तीकडुन योग्य प्रतिसाद मिळणे गरजेचे आहे. शाळा महाविद्यालयामधुन पालक व विद्यार्थ्यांशी संपर्क साधण्याबरोबरच माहिती देण्यासठी व्हाट्सअॅप सारख्या समाज माध्यमांचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. बँक व्यवस्थापनाकडुन ही ग्राहकांना माहिती देण्यासाठी समाज माध्यमांचा वापर केला जात आहे. पोलीस प्रशासनाला समाज माध्यमांचा अनुकूल आणि प्रतिकूल प्रभावाचा सामना करावा लागतो.

सोशल मिडिया आज काळाची गरज आहे. म्हणुनच १७ आणि १८ ऑगस्ट २०१९ रोजी मुंबईतील यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान येथे पहिले मराठी सोशल मिडिया संमेलन आयोजित करण्यात आले होते. यावेळी महाराष्ट्राचे उच्चशिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी सोशल मिडिया म्हणजे करमणुक, वेळ घालविण्याचे साधन नाही तर या माध्यमामुळे चांगली मूल्यनिर्मिती, समृध्द विचार आणि विविध विषयांची सकारात्मक चर्चा होत असल्याचे दिसुन आले आहे. तसेच सोशल मिडिया आपली अभिव्यक्ती समृध्द करण्यासाठी पुरक असल्याचे मत व्यक्त केले यावरून समाज माध्यमे प्रशासनावर प्रभाव पाडतात हे स्पष्ट होते.

**संदर्भ सूची :-**

१) योगेश बोराटे - सोशल मिडिया, अथर्व पब्लिकेशन्स, धुळे २०१९ पृ.क्र. २०
२) उपरोक्त पृ.क्र. १८
३) उपरोक्त पृ.क्र. २०
४) किशोर रक्ताटे - स्ट्रॅटेजी कन्सल्टन्ट - स्त्रोत इंटरनेट

❑❑❑

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani